महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(२)(१)/२०२२/तेवीस दिनांक : १२ जून , २०२४.

## -: प्रसिद्धीपत्रक :-

महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा - २०२२
सहायक कक्ष अधिकारी संवर्गाच्या प्रतीक्षायादीचा निकाल
जाहिरात क्र. ३५/२०२३

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ व दिनांक २२ ऑक्टोबर, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित गट - ब मुख्य परीक्षा - २०२२ या परीक्षेतील सहायक कक्ष अधिकारी संवर्गाच्या एकूण ४९ पदांचा अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मुळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधीन राहुन दिनांक १८ जानेवारी, २०२४ रोजी जाहीर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने आयोगाने सहायक कक्ष अधिकारी या संवर्गासाठी शिफारस केलेल्या एकूण ४९ उमेदवारांपैकी १० उमेदवारांनी नियुक्ती न स्विकारल्यामुळे प्रतीक्षा यादीवरील उमेदवारांची शिफारस करावयाची विनंती शासनाने आयोगास केली आहे. त्यामुळे आयोग प्रतीक्षा यादीवरील उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील गुणवत्ताक्रम, वर्गवारी व शासनाने कळविलेल्या रिक्त प्रवर्गनिहाय पदे इत्यादी बाबी विचारात घेऊन मंत्रालय ९ व आयोग १ अशा एकूण १० पदांवर उमेदवारांची त्यांच्या नावापुढे नमूद केलेल्या प्रवर्गातील आरक्षित जागांसाठी शिफारस करीत आहे. सदर प्रतीक्षायादीनुसार शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल, उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत प्रतीक्षायादीनुसार नियुक्तीस शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरुन तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, अधिसूचनेतील तरतुदीनुसार दावे तपासतांना वा अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

३. प्रस्तुत परीक्षेची प्रतीक्षायादी समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आली आहे.

उप सचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.